# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ३२४/२०२०

**मा. सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०—२१ मधील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून शासनाने, शासन निर्णय क्रमांक—बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६—ब दि. २४ नोंव्हेबर, २०२० अन्वये सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत सुचना दिलेल्या आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडत आहे. तरी सदर शासन आदेशान्वये दिलेल्या सुचनेनुसार शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

२/१२/२०२०.

उपकुलसचिव

शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )

संदर्भ क्र. शै.प्रवेश/२२६७ )

दिनांक : ०२/१२/२०२० )

प्रत:

मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था.

मा. विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in
E-mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९
फोन नं.०२०/२६१११११५३

क्रमांक उशिसं/२०२०/विद्यार्थी प्रवेश / मवि-१/ 7826

दिनांक २५.११.२०२०
25 NOV

प्रति,

१.मा.कुलगुरु,
सर्व अकृषी /अभिमत / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
३.सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय/अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये/मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था

**विषय : मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वर दि.०९.०९.२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरुन सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही**

**संदर्भ :** १.शासन पत्र क्रमांक संकीर्ण १०२०/प्र.क्र.१२७/मशि-२ दि.२५.११.२०२०.
२.शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.२९५/१६-ब,दि.२४.११.२०२०.

उपरोक्त संदर्भिय शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे, अवलोकन करावे. संदर्भीय शासन पत्रातील निर्देशास अनुसरुन संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष-२०२०-२१ मधील विद्यार्थी प्रवेशाबावतची कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी सदर आदेशान्वये दिलेल्या संबंधित सूचनांच्या अनुषंगाने संबंधित अकृषी / अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे तसेच शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / मॉडेल डिग्री महाविद्यालये / वसतीगृहे व परिसंस्था यांना आपल्या स्तरावरुन तात्काळ सूचना देण्यात याव्यात व त्याबाबत कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे- १

प्रत : मा.उपसचिव,मशि-२, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्र. -०२२-२२७९३१७१ ई-मेल —hariram.parhate@nic.in

---

**<u>तातडीचे</u>**

क्रमांक:संकीर्ण १०२०/प्र.क्र.१२७/मशि-२. दिनांक :२५ नोव्हेंबर, २०२०.

प्रति,

१) कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय** :- मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १५७३७/२०१९ वर दि. ९/९/२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरुन सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

**संदर्भ** :- शासन पत्र समक्रमांक दिनांक ११/९/२०२० व दिनांक १२/९/२०२०

महोदय,

वरील विषयासंबधिच्या सामन्य प्रशासन विभागाच्या दिनांक २४/११/२०२० च्या शासन निर्णयाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णयातील तरतूदीनूसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशाबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच, याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास <u>तात्काळ</u> सादर करण्यात यावा.

आपला,

द.रा.कहार
( दत्तात्रय कहार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत वरीलप्रमाणे

प्रत,

१) अवर सचिव, तांशि-४,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) कक्ष अधिकारी, तांशि-६,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) कक्ष अधिकारी, विशी-३,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वर दि.०९.०९.२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक - बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २६ नोव्हेंबर, २०२०

प्रस्तावना -:

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाची आणि राज्यातील नियंत्रणा खालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या उपरोक्त अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत महाधिवक्ता,महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले कायदेशिर अभिप्राय विचारात घेऊन योग्य त्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यानुसार शासन पुढील प्रमाणे सुचना देत आहे

शासन निर्णय :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून संबंधित प्रशासकीय विभागांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.०९.०९.२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ९ सप्टेंबर

Scanned by CamScanner

२०२० पूर्वी एईसीबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावे.

३. वरील सुचना या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील निर्णयाच्या तसेच राज्य शासनाने या कामी देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्याकरीता दाखल केलेल्या अर्जाच्या निर्णयाच्या अधीन राहतील.

४. हा शासन निर्णय अंतरिम स्थगिती उठविण्याच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत लागू राहील.

५. वरील निर्णयांची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी तात्काळ करावी व संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक --- असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. 202011201848461807

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. अं. खडसे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,